17 JUL 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# शिष्यांनी दिली कलेतून गुरुंना मानवंदना

## सतार वादनाने रसिक मंत्रमुग्ध

प्रतिनिधी
कोल्हापूर

हसन हैदर खान यांची शहनाई आणि शिष्यांनी सतारमधून सादर केलेले विविध राग यामुळे रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले. शिवाजी विद्यापीठात 'गुरु – शिष्य परंपरा' या कार्यक्रमात शिष्यांनी कला सादर करत गुरु अरविंद पारीख यांना मानवंदना दिली.

नरेंद्र भोसले यांचे पुत्र वरदराज भोसले यांनी या गुरु–शिष्य परंपरा कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठाचे बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांच्या हस्ते आणि संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे एन. व्ही. चिटणीस, पंडित अरविंद पारीख, सुवर्णलता राव यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे उदघाटन झाले.

अली अहमद खान यांचे पुत्र हसन हैदरखान यांच्या शहनाई वादनाने कार्यक्रमाला सुरूवात झाली. हैदरखान यांनी राग 'भैरव' सादर केला. त्यांना भूषण परचुरे यांनी तबलासाथ केली. वरदराज भोसले यांनी गुजरी तोडी सतार वाजवली. यानंतर हरप्रीतसिंग हसरत यांनी राग 'बैरागी' सादर केला. त्यांना आशुतोष दिघारिया यांनी तबला, तर संदीप



'गुरु – शिष्य परंपरा' या कार्यक्रमात सतारवादन करताना अश्विन दळवी.

तावरे यांनी हार्मोनियम साथ केली. अश्विन दळवी यांनी सूरबहार शुद्ध सारंग गायला. परेश पारेख, निशाद मेस्त्री यांचे सतारवादन झाले. त्यांना गौतम पाल यांनी तबलासाथ केली.सुभाष मिश्रा यांनी व्हायोलिनवर राग 'मित्र पलास' सादर केला. दानिश खान यांनी सतारीवर राग 'यमन' सादर केला. गुणकली भोसले यांनी राग 'झिंझोटी' पेश केला. अमृता कुलकर्णी यांनी सतारवर राग 'कलावती' सादर केला. अल्ताफ खान (मुंबई) यांनी राग 'मिश्र' सादर केला. राजीव जनार्दन यांनी राग 'मारवा', पूर्वी पारेख यांनी 'शुद्ध कल्याण' गायिला; तर सुंदर नाथ यांनी सतारवर 'कुरिया धनेशी' सादर केली. रफत खान नियाजी यांनी राग 'भैरवी' सादर करत 'गुरु–शिष्य परंपरा' या कार्यक्रमातील पहिल्या दिवसाची सांगता केली. सोमवारी अन्य कलाकार आपली कला सादर करणार आहेत.

17 JUL 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# जादुई सतारवादनाने गुरूंना वंदन

## विद्यापीठात रंगली मैफल : गुरुपौर्णिमेचे औचित्य

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात देशातील आघाडीच्या गायक-वादकांची आज संगीत मैफल रंगली. शहनाई, सतार, व्हायोलिन अशा वाद्यांच्या मंजूळ सुरावटीतून विविध रागांतील सौंदर्याचा सुंदर आविष्कार येथे रसिकांनी अनुभवला. दीर्घ रियाजातून अवगत केलेली जादुई स्वरांची नजाकत उत्तम ताकदीने पेश करत वादकांनी गुरूंना वंदन केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे व संगीत नाट्यशास्त्र विभागाचे डॉ. व्ही. एन. चिटणीस यांच्या उपस्थितीत



**संगीत मैफलीत सतारवादन करताना आश्विन दळवी.**

मैफलीचे उद्घाटन झाले. एकाच वेळी देशभरातील आघाडीच्या पन्नास कलावंतांच्या सहभागाने मैफल रंगताना शहरातील सांगीतिक वैभवात भर घालणारी संगीत सेवा या मैफलद्वारे घडत आहे. याबद्दल मान्यवरांनी कलावंतांना शुभेच्छा देत मैफल सुरू झाली. उस्ताद विलायत खाँसाहेब यांची उपस्थिती गुरुस्थानी होती.

### सांगीतिक मेजवानी आजही

**रविवारी (ता. १७) गायक अजित कित्तुरे, प्रशंस शास्त्री, वर्षा सोहळे, तुषार भाटीया, नितीन परमार, अमरिता मोरे, शोभित नहार, मधुरा करंबळेकर, संजय संत, प्रेमल भाना, राम कृष्णदास आदी कलावंतांचे गायन व वादन होणार आहे.**

पहिल्या सत्रात हैदर खान यांनी शहनाईद्वारे राग अहीर भैरव सादर करत प्रसन्नतेचा साज दिला. सतारवादन सत्रात कोल्हापूरचा उमदा सतारवादक वरद भोसले यांनी रागगुजरी तोडी सादर केला. हळुवार सुरावटींच्या आलापाने मैफलमध्ये पहिल्याच टप्प्यात जाण भरली. त्यानंतर हरप्रीत सिंग यांनी राग बैरागी, आश्विन दळवी यांनी शुद्ध सारंग पेश करीत मैफलीच्या पहिल्या सत्राचा समारोप केला.

दुसऱ्या सत्रात परेश पारेख, निषाद मेस्त्री यांनी सतारवादन केले. यात राग खमाज सादर केला, त्यानंतर दानिश खान यांनी सतारीद्वारेच राग यमन, गुणकली भोसले यांनी राग झिंझोटी तर अमृता कुलकर्णी यांनी राग कलावती, अल्ताफ खान यांनी राग मिश्र पैलू, राजीव जनार्दन यांनी राग मारवा, पूर्वी पारखी यांनी शुद्ध कल्याण तर सुंदर नाथ यांनी पुरिया धनश्री सादर केला. रफल खान यांनी भैरवी सादर केली. सुभाष मिश्रा यांनी व्हायोलिनवादनातून भीम पालाशी राग सादर करीत सत्र सांगता केली.